
सुराज्य सोलापूर

सोमवार, दि. ८ जुलै २०२४

# पंढरपूरच्या आषाढी वारीत 'कारण' राजकारण अध्यात्मिक सोहळ्याला फासले जाताहेत पक्षीय रंग

## दक्षिण काशीच्या आषाढी वारीची वाट राजकारणाकडे वळवून बिकट करणाऱ्यांवर चर्चेचे महाराष्ट्रात धुमशान

देवानंद साळवे/अकलूज







आषाढी वारीचा महाराष्ट्रातील सर्वात मोठा अध्यात्मिक इव्हेंट दक्षिणकाशी पंढपरपुरात येत्या १७ जुलैला होतोय. यासाठी काँग्रेसचे राष्ट्रीय नेते राहुल गांधी हे हजेरी लावतील असं अपेक्षित आहे. वारीमध्ये ते सहभागी होऊन वारकऱ्यांशी ते संवाद साधतील तसंच श्री विठ्ठल रुक्मीणींचं दर्शन घेतील असं साधारण नियोजन आहे. मात्र गांधी यांच्या वारीत सहभागी होण्याला राजकिय झालर लावली जात आहे.

राजसत्ता आणि धर्मसत्ता या दोन्हीही स्वतंत्र गोष्टी असल्या तरीही एकमेकांवर अवलंबून असलेल्या आहेत. या दोन्हीही क्षेत्रात एकमेकांनी हस्तक्षेप करू नये याबाबत अनेक विचार मंथने झाली असली तरीही मानवी जीवनाचा दोन्हीही अविभाज्य घटक असल्याने राजसत्ता व धर्मसत्ता एकमेकांच्या क्षेत्रात उठाठेव करत असल्याचा इतिहास ज्ञात आहे.

गेली कित्येक दशके साहित्यपिठावर राजकिय व्यक्तींनी उपस्थित राहावे का राहू नये? साहित्य संमेलनाच्या राजकिय नेत्यांच्या उपस्थितीबद्दलही अनेक चर्चासत्रे झडली असली तरीही धर्म, संस्कृती, साहित्य आणि राजकारण यांचा जवळचा संबंध आत्तापर्यंत तरी राहिलाच आहे. या साऱ्यांची चर्चा होण्याचे कारण म्हणजे भारतातील सर्वात मोठ्या संप्रदायाची परंपरा असलेल्या आषाढी वारीमध्ये लोकसभेचे विरोधी पक्ष नेते व काँग्रेसचा चेहरा राहुल गांधी हे आषाढी वारी मध्ये सहभागी होणार असल्याचे जाहिर झाले आहे.

गत आठवड्यात महाराष्ट्रातील ज्येष्ठ नेते शरद पवार हे नूतन खा. धैर्यशील मोहिते पाटील,खा.सुरेश म्हात्रे ,शिवसेनेचे खा.संजय दिना पाटील,खा.प्रणिती ताई शिंदे यांच्या समवेत खासदार राहुल गांधी यांना भेटण्यासाठी व वारीमध्ये सहभागी होण्यासाठीच




आमंत्रण देऊन आले. आणि सुरू झाला वारीच्या राजकारणाचा प्रवास. यामध्ये काँग्रेसचे नेते विरुद्ध भाजपचे नेते असा सामना तर सुरू झालाच परंतु पंढरपूरच्या वारीमध्ये खा.राहुल गांधी यांचे सहभागी होणे योग्य की अयोग्य याबाबत नेत्यांची मतमतांतरे देखील सुरू झाली.

महाराष्ट्रात विधानसभेची निवडणूक येत्या ऑक्टोबरमध्ये हेण्याची शक्यता आहे. त्या पार्श्वभूमीवर राहुल गांधी आषाढी वारीत सहभागी झाले तर महाविकास आघाडीला त्याचा फायदा होईल, असा कयास विरोधकांनी बांधला असेल. त्यातूनच मग राजकारण सुरू झाले आहे. एकूणच पंढरपूरच्या वारीचा इतिहास पाहता या वारीमध्ये गेली हजारो वर्षापासून सर्व धर्माचे, पंथाचे,सांप्रदायाचे लोक कोणत्याही आमंत्रणाशिवाय, गुण्यागोविंदाने सहभागी होतात. कोणत्याही नवसाशिवाय सर्वसामान्य जनतेचा, शेतकऱ्यांचा,कष्टकऱ्यांचा, मध्यमवर्गीयांचा असणारा पंढरपूरचा पांडुरंग प्रत्येकाला आपला वाटतो. सध्या बिघडलेली राजकिय परिस्थिती पाहता या वारीमध्ये कोणी सहभागी व्हावे अथवा होऊ नये हा ज्याचा त्याचा वैयक्तिक प्रश्न आहे. वारीमध्ये सहभागी होण्यासाठी तुम्हाला कोणत्याही प्रकारची अट नसते. पांडुरंगाचे नामस्मरण करत टाळी वाजवावी. पायी चालावे भक्तीमध्ये तल्लीन व्हावे. असे असताना वारीची वाट राजकारणाकडे वळवून बिकट करणाऱ्यांना पांडुरंग 'सुबुद्धी देईल का '? आणि राजकारण्यांनीच राजकारणाविषयी चर्चा करण्यापेक्षा वारीतील वारकऱ्यांच्या मूलभूत प्रश्नांकडे लक्ष वळवून पांडुरंगाचा प्रसाद पदरी पाडून घेतील का? असा प्रश्न महाराष्ट्रातील तमाम नागरिकांना पडू लागला आहे.

### तर मग आत्ताच का वारीत चालण्याचा अट्टाहास?

महायुतीचा आरोप -सदैव हिंदूंचा द्वेष करणाऱ्या व्यक्तीला वारीत कसे बोलावले जाऊ शकते?वारकऱ्यांचा पायी प्रवास सुखकर व्हावा, यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आळंदी ते पंढरपूर पालखी मार्गासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी दिला आहे. यामध्ये मोदी यांनी कधीही राजकारण केले नाही. मात्र राज्यातील आगामी विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून राहुल गांधी आणि शरद पवार यांनी आषाढी वारीत चालण्याचे ठरवले आहे. आषाढी सोहळ्याचा राजकारणासाठी वापर करू नये. राहुल गांधी यांनी यापूर्वी कधीही विठ्ठलाचे दर्शन घेतले नाही. मग आत्ताच का?

### कोणाच्या आगमनावर राजकारण कशाला?

विठुरायाचे दर्शन घेण्यासाठी एखादी राजकीय व्यक्ती येणार असेल तर त्याचे कोणीही राजकारण करू नये. इंडिया आघाडीचा नेता असो किंवा एनडीए सरकारचा नेता. आषाढी वारीही महाराष्ट्राची संस्कृती आणि धार्मिक परंपरा आहे. ती सातासमुद्रापार गेली आहे. विरोध करून या परंपरेला कोणी गालबोट लावण्याचा प्रयत्न करू नये. वारीचा सोहळा पाहण्यासाठी आणि विठुरायाच्या दर्शनासाठी देश विदेशातून लाखो भाविक येतात. एखादा राष्ट्रीय पातळीवरील नेता येत असेल तर त्याचे स्वागत केले पाहिजे. यामध्ये राजकारण आणू नये.

### महाविकास आघाडीचे दौऱ्यासंबंधीचे गणित

आगामी काळात म्हणजेच साधारण ऑक्टोबर - नोव्हेंबरमध्ये राज्यात विधानसभा निवडणूक होण्याची शक्यता आहे. त्यामुळे महायुती तसेच महाविकास आघाडीने निवडणुकीची तयारी सुरु केली आहे. त्याचाच एक भाग म्हणून आता महाविकास आघाडीने राहुल गांधींना वारीत सहभागी होण्यासाठी म्हणून आमंत्रित केले असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. राहुल गांधी पंढरपूरच्या वारीत सहभागी झाल्याने याचा फायदा महाविकास आघाडीला आगामी विधानसभा निवडणुकीत होऊ शकतो अशी भावना मविआच्या नेत्यांमध्ये आहे.



लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचं नाव न घेता चंद्रकांत पाटील यांनी टोला लगावला आहे. उशिरा का होईना देवासमोर नतमस्तक व्हायची इच्छा निर्माण झाली. जसं जसं आपलं वय जाते तस तसे परमेश्वराची आस निर्माण होते. त्यामुळे त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे.

**-चंद्रकांत पाटील,** पालकमंत्री, सोलापूर



राहुल गांधी यांनी आषाढी पालखी सोहळ्यात कॅट वॉक करायला येऊ नये. कोणत्याही राजकीय पक्षाने या भोळ्या भाबड्या वारकरी संप्रदायाचा राजकीय फायदा उठविण्याचा प्रयत्न करू नये. आजवर राहुल गांधी यांना कधी विठ्ठल अथवा पालखी आठवली नाही. मात्र आता निवडणुकीच्या तोंडावर राजकीय फायदा घेण्यासाठी येण्याच्या चर्चा सुरू केल्या आहेत, त्याचा निषेध आम्ही करतो.

**- रणजितसिंह नाईक-निंबाळकर,** माजी खासदार, माढा



मोठ्या माणसांवर टीका करून स्वतःचे महत्त्व वाढवून घेण्याचा माजी खा. रणजितसिंह निंबाळकरांचा हा केविलवाणा प्रयत्न आहे. निंबाळकर अजूनही पराभवाच्या धक्यातून सावरले नाहीत. त्याच नैराश्यातून त्यांनी राहुल गांधींना विरोध केला आहे. राहुल गांधी यांना वारीसंबंधीचे निमंत्रण दिले आहे. त्यांनी निश्चित येतील. अद्याप त्यांचा दौरा मात्र अधिकृत जाहीर झालेला नाही.

**- धैर्यशील मोहिते-पाटील,** खासदार, माढा

आषाढी एकादशी दिवशी पंढरपूर मध्ये १५ लाख भाविक एकत्र येतात. या सगळ्या गर्दीत कोण आले आणि कोण गेले याची प्रसिद्धी करायला कोणालाही वेळ नसतो. वारीत कोणाला यावे म्हणून निमंत्रण दिले जात नाही आणि कोणी येऊ नये म्हणून त्याला थोपवले जात नाही. प्रत्येक व्यक्तीचा स्वार्थ असतो. त्यासाठी तो कृती करत असतो. लोकसभा निवडणुकीपूर्वी राम मंदिराची उभारणी झालीच होती. त्याला धार्मिक व राजकीय रंग कोणी दिला नव्हता. राहुल गांधींनी यापूर्वीही भारत जोडो यात्रा केली आहे. आजही त्यांना पंढरपूरला यावे वाटले असेल तर तो त्यांच्या श्रद्धेचा प्रश्न आहे. वारकरी संप्रदाय येणाऱ्या प्रत्येकाचं मोठ्या मनाने स्वागत करत असतो.

**-सिताराम महाराज वाघ,** लवंग, ता. माळशिरस

## राष्ट्रवादीच्या 'विठ्ठला'कडं साकडं

# पंढरीचे 'बीआरएस'चे वारकरी गोविंद बागेत

### विजयासाठी 'भगीरथ' प्रयत्न करु; पंढरपूर-मंगळवेढ्यात फुंकू तुतारी, द्यावी उमेदवारी !

पंढरपूर/प्रतिनिधी



**बारामती : येथील गोविंद बागेत पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदार संघाच्या उमेदवारीबद्दल शरद पवार यांच्याशी चर्चा करताना भगीरथ भालके यांच्यासह श्री विठ्ठल परिवाराचे नेते.**

लोकसभा निवडणुकींचा मोहोल संपल्यानंतर आता राज्यात विधानसभा निवडणुकीच्या हालचालींना वेग येऊ लागला आहे.पंढरपूर-मंगळवेढा मतदार संघदेखील याला अपवाद कसा राहणार? या मतदार संघात इच्छुकांनी हालचाली वाढविल्याचं प्रत्त्यंत्तर आज रविवारी (ता.७) आलं. बीआरएसचे नेते भगीरथ भालके यांनी त्यांच्या काही खास समर्थकांसह बारामतीमधील गोविंद बाग गाठून राष्ट्रवादीचे 'विठ्ठल' अर्थात राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे सर्वेसर्वा शरद पवार यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा करत या गटाची उमदेवारी देण्यासाठी साकडं घातलं.

दरम्यान, श्री विठ्ठल परिवार हा आपल्याच वर्चस्वाखाली असून विधानसभा निवडणूक लढण्यावेळी हा परिवार माझ्यासोबत असेल असा दावा भालके यांनी शरद पवारांकडे केला. विशेषत्वे, माजी आमदार प्रशांत परिचारक यांना भाजपकडून उमेदवारी मिळण्यासंबंधी साशंकता असल्यानं राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाची उमेदवारी परिचारक यांना मिळण्यासाठी 'पांडूरंग' परिवार शरद पवारांच्या भेटीला जाणार होता. त्याअगोदर विठ्ठल परिवारानं पवारांना भेटून त्यांच्या पक्षाची विधानसभेची उमेदवारी मागितल्यानं पांडूरंग परिवाराची पंचायत झाल्याची चर्चा सुरु झाली आहे.

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकित महाविकास आघाडीच्या उमेदवार प्रणिती शिंदे या काँग्रेसमधून उभ्या होत्या. सोलापूर लोकसभा मतदारसंघातील पंढरपूर-मंगळवेढा विधानसभेतून भगीरथ भालके यांनी आपल्या हक्काच्या मताधिक्याचं पाठबळ त्यांना देऊन आपली ताकद दाखवून दिली होती. दोन-अडीच वर्षांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस सोडून बीआरएस म्हणजे भारत राष्ट्र समितीत प्रवेश केलेले भगीरथ भालके यांनी आज बारामतीत गोविंद बागेत जाऊन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे सर्वेसर्वा ज्येष्ठ नेते शरद पवार यांची भेट घेतली. भालके हे पंढरपूर-मंगळवेढ्यातून विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी इच्छूक आहेत. पवारांच्या भेटीला जाताना भालकेंनी विठ्ठल परिवारातील नेत्यांनाही सोबत घेतले होते. त्यामुळे भालकेंच्या घरवापसीची जोरदार चर्चा रंगली आहे.

विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अभिजित पाटील यांनी लोकसभा निवडणुकीत भाजपला पाठिंबा दिल्यानंतर भगीरथ भालकेंनी गोविंद बागेत जाऊन भेट घेणे हे महत्वाचे मानले जात आहे. अभिजित पाटील यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केल्यानंतर भालकेंनी पवारांची साथ सोडत बीआरएसमध्ये प्रवेश केला होता. आता भगीरथ भालके यांनी पवारांची भेट घेतल्याने एक राजकीय वर्तुळ पूर्ण झाले आहे. भगीरथ भालके यांच्यासोबत युवराज पाटील, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष गणेश पाटील यांच्यासह विठ्ठल परिवारातील प्रमुख नेते होते. या भेटीचा तपशील मिळू शकला नसला तरी भालके हे पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक आहेत. महाविकास आघाडीकडून संधी मिळावी, अशी त्यांची इच्छा आहे. आता ते पवारांच्या पक्षात प्रवेश करणार की काँग्रेसकडून निवडणूक लढवणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

स्व. आमदार भारत भालके यांच्या निधनानंतर २०१९ मध्ये झालेल्या पोटनिवडणुकीत भगीरथ भालके यांनी राष्ट्रवादी काँग्रेसकडून पंढरपूरची पोटनिवडणूक लढवली होती. त्यात त्यांचा निसटता पराभव झाला होता. भगीरथ भालके आत्ताही पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघातून विधानसभेची निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक आहेत. त्याबाबतची घोषणा त्यांनी काही महिन्यांपूर्वीच केली आहे.

भारत भालके यांच्या निधनानंतर २०१९ मध्ये झालेल्या पोटनिवडणुकित भगीरथ भालके यांनी राष्ट्रवादी काँग्रेसकडून पंढरपूरची पोटनिवडणूक लढवली होती. त्यात त्यांचा निसटता पराभव झाला होता. भगीरथ भालके आत्ताही पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघातून विधानसभेची निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक आहेत. त्याबाबतची घोषणा त्यांनी काही महिन्यांपूर्वीच केली आहे.

आताही महाविकास आघाडीकडून आपल्याला संधी मिळावी अशी त्यांची अपेक्षा आहे. लोकसभा निवडणुकित त्यांनी काँग्रेसच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांना पाठिंबा दिला होता. काँग्रेसच्या वरिष्ठ नेतृत्वाशी त्यांनी विधानसभा निवडणुकिसंदर्भात शब्द घेतल्याचे सांगितले जात आहे.

विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अभिजित पाटील यांनी कारखान्यावर पडलेल्या छाप्यानंतर ऐन लोकसभा निवडणुकित भाजप सोबत जाण्याचा निर्णय घेतला होता. तो निर्णय भगीरथ भालके यांच्या पथ्यावर पडला असून अभिजित पाटील हे भाजपमध्ये गेल्यामुळे शरद पवार गटाकडून भालके हे उमेदवारीची चाचपणी करू शकतात. त्यातूनच त्यांच्या घरवापसीची चर्चा बारामती येथे शरद पवार यांच्या झालेल्या भेटीनंतर रंगली आहे.

महाविकास आघाडीत पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघ हा राष्ट्रवादी काँग्रेसकडे आहे. भगीरथ भालके यांनी काँग्रेस नेतृत्वाशी संधान साधले असले तरी हा मतदारसंघ काँग्रेसला सोडून घेण्याचे मोठे दिव्य सोलापुरातील काँग्रेस नेत्यांना करावे लागणार आहे.

### भालकेंच्या घरवापसीची चर्चा

विठ्ठल परिवारातील प्रमुख नेते असलेले युवराज पाटील आणि गणेश पाटील यांना सोबत आणून विठ्ठल परिवार आपल्या सोबतच असल्याचे भालके यांनी दाखवून दिल्याचे बोलले जात आहे. कारण विठ्ठल सहकारी साखर कारखान्यावर सत्ता जरी अभिजित पाटील यांची असली तरी मूळ विठ्ठल परिवार आपल्यासोबत असल्याचे भगीरथ भालके यांनी दाखवून दिल्याचे बोलले जात आहे. या भेटीमुळे भालकेंच्या घरवापसीची चर्चा रंगली आहे. त्याबाबत लवकरच निर्णय होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातून आता भगीरथ भालके हे तुतारी वाजवणार असल्याचे संकेत भेटीमधून चर्चेले जाऊ लागले आहे.

# 'मोहोल'को दो योद्धे हुए फायनल

## कौन रहेगा तिसरा चेहरा?



**आमदार यशवंत माने**



**संजय क्षीरसागर**

सोलापूर/प्रतिनिधी

बहुचर्चित आरक्षित मोहोळ विधानसभेच्या आखाड्यात अजित पवार राष्ट्रवादी गटाकडून आमदार यशवंत माने यांची उमेदवारी आज रविवारी (ता.७) माजी आमदार राजन पाटील यांनी घोषित केली. तत्पूर्वी मागच्या काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे सर्वे सर्वा शरद पवार यांनी संजय क्षीरसागर यांच्या पाठीवर हात ठेवत इथली जागा कोणत्याही परिस्थितीत जिंकून आणा, तयारी लागा असे सांगत क्षीरसागर यांच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब केलं. त्यामुळे मोहोळ विधानसभेच्या आखाड्यात आता आमदार यशवंत माने आणि लोकसेवक संजय क्षीरसागर हे दोघे उमेदवार निश्चित झाल्याचं मानलं जात आहे.

दरम्यान, या मतदार संघात उमदेवारींचा तिसरा चेहरा कोण? याबद्दलचं औत्सुक्य मतदार संघाला आता लागून राहिलं आहे. महाविकास आघाडीनं विधानसभेची निवडणूक एकत्रीत लढण्याचे ठरविले आहे. महाविकास आघाडीमधील शरद पवार गटानं मोहोळच्या जागेवर दावा सांगितला आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे गटाची भूमिका काय असणार? यावरुन या गटाच्या उमदेवारींचा विषय होऊ शकतो.

शिवाय महायुतीमध्ये मित्र पक्ष असलेल्या राष्ट्रवादी अजित पवार गटातर्फे माजी आमदार राजन पाटील यांनी आमदार यशवंत माने यांची उमेदवारी जाहीर केली. येथे भाजप स्वतंत्र उमेदवार कसा देणार? हा महत्त्वाचा मुद्दा आहे. मित्र पक्षामुळे शिंदे सेनेला येथे उमेदवार देणे ही अवघड आहे.